हरित भारत अभियानाची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी दोन अशासकीय संस्थांची निवड करण्याबाबत...

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांकः एफडीएम -२०१७/प्र.क्र.३९ /फ-२

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

तारीख: २९ सप्टेंबर, २०१७

<u>वाचा</u> :-

१) शासन निर्णय, महसुल व वन विभाग, क्रमांक-एफडीएम -२०१५/प्रक्र.२१९/फ-२, दि. २०.०४.२०१६.

२) अपर प्रधान मुख्यवनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१/सी/जिम/प्र.क्र.०६/१७-१८/१११२, दि.०८.०९.२०१७

<u>प्रस्तावना</u> :-

हवामानातील बदलामूळे नैसर्गिक साधन संपत्तीची गुणवत्ता, प्रकार, वाटप आणि वापर या संदर्भात होणारे गंभीर परिणाम जाणवत आहे. त्यामूळे वनांचे संरक्षण, विकास, संवर्धन आणि शास्त्रोक्त व्यवस्थापनाद्वारे पर्यावरणीय आणि वातावरणीय बदलांचे परिणाम कमी करणे हे मोठे आव्हान आहे. त्यासाठी राज्यात हरित भारत अभियान राबविण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या अभियानाअंतर्गत देशातील वनक्षेत्र आणि वृक्षाच्छादन कमीत कमी ५० लाख हेक्टर पर्यंत वाढविणे, सुमारे ५० लाख हेक्टर अस्तित्वातील वन/वनेत्तर क्षेत्रातील वनांच्या/वृक्षाच्छादनाच्या गुणवत्तेत वाढ करणे, वनांवर अवलंबून असणाऱ्या किमान ३० लाख कुटुबांना उपजिविकेचे साधन निर्माण करुन वाढीव उत्पन्नासाठी प्रयत्न करणे, वने आणि इतर परिसंस्था (Ecosystems) याद्वारे कार्बनचे शोषण आणि साठवण (Carbon Sequestration & Storage) करुन सुधारीत/वर्धित जल, जैवविविधता आणि परिस्थितीकीय सेवा उपलब्ध करुन देणे त्याच बरोबर जळाऊ इंधन, चारा, लाकुड आणि गैर इमारती लाकुड इत्यादिंची व्यवस्था करणे असे हरित भारत अभियानाअंतर्गत पुढील १० वर्षातील लक्ष/उद्दिष्ट आहे.

हरित भारत अभियानाची राज्यात अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने त्या अंतर्गत नियोजन, वार्षिक आराखडा आणि इतर बाबींविषयी मार्गदर्शन करण्यासाठी राज्य आणि जिल्हास्तरीय समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. सदर समित्यापैंकी राज्य स्तरावरील सुकाणू समितीमध्ये राज्यातील वनसंवर्धन आणि उपजिविकाक्षेत्रात कार्यरत असलेल्या नामांकित अशासकीय संस्थापैंकी २ संस्थांची नेमणूक करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे हरित भारत अभियानाची राज्यात अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने राज्यात वनसंवर्धन आणि उपजिविका क्षेत्रात कार्यरत असलेल्या खालील दोन नामांकित अशासकीय संस्थांची नामनिर्देशनाने राज्य स्तरावरील सुकाणू समितीमध्ये नेमणूक करण्यात येत आहे :-

१) आम्ही आमच्या अरोग्यासाठी, ता.कुरखेडा, जि.गडचिरोली

२) नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान, ता.रेवदंडा, जि.अलिबाग.

२. उपरोक्त नमूद केलेल्या अशासकीय संस्थांची राज्यस्तरीय सुकाणू समितीमधील नेमणूक प्रथमत: दोन वर्षाकरिता राहील. राज्यस्तरीय सुकाणू समितीची बैठक सहा महिन्यातून किमान एक वेळ घेण्यात येईल.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०९२९१७३६३७६६१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Atul Ashok Kode
Date: 2017.10.04 12:02:19 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत,

१) मुख्य सचिव यांचे सह सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय , मुंबई-३२
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) / (उत्पादन व व्यवस्थापन) / (संशोधन व शिक्षण), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
४) प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य वनविकास महामंडळ, रॉवेल प्लाझा, कडवी चौक, नागपूर
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा महासंचालक, सामाजिक वनीकरण संचालनालय, महाराष्ट्र, राज्य पुणे.
६) मा. मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
७) सचिव (वने) यांचे स्वीय सहाय्यक.
८) निवडनस्ती, फ-२ कार्यासन, महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.